# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२)
दूरध्वनी क्र. ०२५३/२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपिल क्र.५२१८/२०२४/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.दर्शन मंगेश बकरे, रा.गाळा नं.७ व ८, कैलास बिल्डींग, मेहेर सिग्नल शेजारी, नाशिक ता.जि.नाशिक. | सहाय्यक अधिक्षक, कर विभाग, नाशिक महानगरपालिका विभागीय कार्यालय नाशिक पश्चिम, जुनी पंडित कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. | विभागीय अधिकारी, नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नाशिक पश्चिम, जुनी पंडित कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक २७/०२/२०२६**

१. **उपस्थिती -**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपिल अर्ज —**

(१) द्वितीय अपिल अर्जाचा दिनांक : १८/१०/२०२४

(२) द्वितीय अपिल अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिला. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मोघम आदेश पारित केलेला आहे.

(३) द्वितीय अपिल अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०९/०७/२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०९/०७/२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन १९७७ पासून २०२४ पावेतो.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : नाशिक शिवारातील सिटी सर्व्हे नं.६२२ आणि ६२२ अ यांसी म्युनिसिपल कमिटी नं.४८०/३/२ यांसी भूमापन क्र.६६५/१/३अ/३ या प्लॉटवर बांधलेल्या कैलास नावाचे इमारत ही साधारणपणे ४५ वर्षांपूर्वी बांधलेली आहे. सदर

|  |  |  |  |
|---|---|---|---|
|  |  |  | इमारतीमधील तळ मजल्यावरील गाळा मिळकत नं.७ व ८ गारवा केटरिंग सर्व्हीसेस तर्फे भागीदार या नात्याने पूर्वीपासून तसेच आजदेखील आमचे कब्जेवहिवाटीत भाडेकराराने आहे. त्यामुळे सदर मिळकतीबाबत तुमचे कार्यालयामार्फत वार्षिक भाडयाचे आकारणीकरिता मिळकतीची विस्तृत माहिती घरपट्टी चतु:वार्षिक रिव्हीजन (Appendix D) मध्ये नोंदणी केलेले रजिस्टरचे प्रती सही शिक्क्यानिशी मिळावे. |
| (५) | जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक, कर विभाग, नाशिक पश्चिम विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.१६/०७/२०२४ च्या पत्रानवये सदर इमारतीतील मिळकतीसंदर्भात माहिती अर्जदारास द्यावी किंवा कसे याबाबत मिळकतधारक यांना विचारणा केली असता, त्यांनी अर्जदार यांनी विचारलेली माहिती देऊ नये असा लेखी हरकत अर्ज इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. त्यानुषंगाने संबंधितांनी त्यांचे मिळकती संदर्भातील वैयक्तिक माहिती प्रदान करणेस लेखी हरकत घेतली असल्याने केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधितांनी हरकत घेतली असल्यास त्यांची लेखी संमती असलेशिवाय त्रयस्थ पक्षीय माहिती उपलब्ध करुन देता येत नाही याची कृपया नोंद घ्यावी असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते. |

| ४. | **प्रथम अपिल –** |  |  |
|---|---|---|---|
| (१) | प्रथम अपिल अर्जाचा दिनांक | : | ०५/०८/२०२४ |
| (२) | प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०५/०८/२०२४ |
| (३) | प्रथम अपिल दाखल करण्याचे कारणे | : | माहिती देण्यास नकार दिलेला आहे. |
| (४) | प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय अधिकारी, नाशिक पश्चिम, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.२२/०८/२०२४ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि.१६/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना मुदतीत उत्तर दिल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थी यांनी सुनावणीवेळी मागणी केलेनुसार घरपट्टी देयकाची प्रमाणित प्रत देणेत यावी असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. |

५. **युक्तीवाद / लेखी खुलासा** - अपिलार्थी यांनी सुनावणीवेळी असे सांगितले की, अपिलकार हे सदर मिळकतीमधील तळमजल्यावरील गाळा नं.७ व ८ मध्ये गारवा केटरींग सर्व्हीसेस या नावाने कुटुंबासह व्यवसाय चालवित आहे. सदरचे गाळामिळकती अपिलकर्ता व त्यांचे कुटुंब यांचे ताब्यात सुमारे ४० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून ताब्यात असून पूर्वीपासून आजपावेतो तेथे व्यवसाय चालवित आहेत. श्री.अमोल वाघचौरे यांस अपिलकार यांचे अर्जाबाबत कशी माहिती मिळाली तसेच हरकतदार श्री.अमोल वाघचौरे यांचे हरकतीनंतर अपिलकार यांस त्यांची बाजू मांडण्याची कोणतीही संधी न देता परस्पर अर्ज निकाली केल्यामुळे मोठा अन्याय झालेला आहे. अपिलकार यांनी हरकतदार श्री.अमोल वाघचौरे यांचेविरुध्द व हरकतदार यांनी अपिलकर्ता यांचेविरुध्द मे.नाशिक कोर्टात दावा दाखल केलेले आहेत. सदर दोन्ही दावे मे.नाशिक कोर्टात प्रलंबित आहेत. हरकतदार श्री.अमोल वाघचौरे यांनी अपिलकार यांचे अर्जास हरकत घेण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. त्यामुळे हरकतदार यांची लबाडी उघडकीस येऊ नये यासाठी खोटी हरकत त्यांनी नोंदविलेली आहे. तसेच सदर हरकतीचा गैरवापर होऊन परस्पर अपिलकार यांचा अर्ज निकाली काढलेला आहे. अपिलकार यांनी मागणी केलेले दस्त मे.नाशिक कोर्टात दाखल करणे अत्यंत आवश्यक व गरजेचे असल्यामुळे सदरचे दस्त अपिलकारास मिळावे ही विनंती.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांच्या दि.०९/०७/२०२४ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत दि.१६/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांनी त्यांचे मिळकती संदर्भातील वैयक्तिक माहिती प्रदान करणेस लेखी हरकत घेतल्याने केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधितांनी हरकत घेतली असल्यास त्यांची लेखी संमती असलेशिवाय त्रयस्थ पक्षीय माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपिलार्थीस कळविले आहे.

६. **निष्कर्ष** -

(१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक, कर विभाग, नाशिक पश्चिम विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.१६/०७/२०२४ च्या पत्रान्वये सदर इमारतीतील मिळकतीसंदर्भात माहिती अर्जदारास द्यावी किंवा कसे याबाबत मिळकतधारक यांना विचारणा केली असता, त्यांनी अर्जदार यांनी विचारलेली माहिती देऊ नये असा लेखी हरकत अर्ज इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. त्यानुषंगाने संबंधितांनी त्यांचे मिळकती संदर्भातील वैयक्तिक माहिती प्रदान करणेस लेखी हरकत घेतली असल्याने केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधितांनी हरकत घेतली असल्यास त्यांची लेखी संमती असलेशिवाय त्रयस्थ पक्षीय माहिती उपलब्ध करुन देता येत नाही याची कृपया नोंद घ्यावी असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते.

(२) अपिलार्थी यांच्या प्रथम अपिल अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय अधिकारी, नाशिक पश्चिम, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.२२/०८/२०२४ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि.१६/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना मुदतीत उत्तर दिल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थी यांनी

सुनावणीवेळी मागणी केलेनुसार घरपट्टी देयकाची प्रमाणित प्रत देणेत यावी असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढल्याचे दिसून येते.

(३) अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाच्या हिताला कोणतीही संभाव्य हानी अथवा क्षती पोहोचेल अशी माहिती नसून शासकीय व अधिकृत कामकाजाशी संबंधित अशी माहिती आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक, नाशिक पश्चिम विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०९/०७/२०२४ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

(२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.५२१८/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**( भूपेंद्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

जावक क्र. 2634 दिनांक : 07 APR 2026

---